# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ८००/२०१८,                    पुणे शहर, दिनांक- २४/०१/२०१८

**विषय :- दिनांक- २६/०१/२०१८ रोजीचे भक्तीशक्ती चौक,निगडी येथे राष्ट्रध्वज उद्घाटन कार्यक्रमा निमीत्ताने वाहतूक व्यवस्थेत होणा-या बदलाबाबत...**

-------------oo----------

दिनांक- २६/०१/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता, भक्तीशक्ती चौकालगत असलेल्या भक्तीशक्ती उद्यान निगडी पुणे येथे उभारण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा उद्घाटन समारंभ कार्यक्रम असल्याने सदर कार्यक्रमास नागरीक मोठ्या प्रमाणात जमणार आहेत त्यामुळे कार्यक्रमाचे लगत असलेल्या पुणे-मुंबई महामार्गावरील वाहतुक संथ होणार आहे, राष्ट्रध्वज उद्घाटन कार्यक्रमाचे ठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी,अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन पुणे-मुंबई महामार्गावरील भक्तीशक्ती चौक या ठिकाणी मुंबईकडे जाणारी वाहीनी दिनांक- २६/०१/२०१८ रोजी सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० वा.पर्यंत आवश्यकत्तेनुसार सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्यात येत असून तेथे दुस-या वाहीनीवर दुहेरी वाहतुक चालू करण्यात येणार आहे.

तरी भक्तीशक्ती चौक,निगडी येथे होणा-या वाहतूक व्यवस्थेतील होणा-या बदलामुळे सदर चौकात वाहतुक संथ होणार असल्याने नागरीकांनी/वाहनचालकांनी त्याबाबत माहिती घेऊन वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे ही विनंती.

# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/ ८०३ /२०१८ पुणे शहर, दिनांक – २४.०१.२०१८

**विषय :- मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावले बाबत करण्यात आलेल्या कारवाई बाबत.**

--------oo---------

सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय भारत सरकार यांचेकडील नं.आरटी-११०२१/३८/२०१७-एमव्हीएल दिनांक- ०७ डिसेंबर २०१७ चे नोटीफिकेशन नुसार वाहनचालक हे मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावत असतील तर सदर वाहनचालक हे कलम-५२ मोटार वाहन कायदा १९८८ प्रमाणे उल्लंघन करीत असून त्यांचेवर मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९० व कलम १९१ प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे. दिनांक- ०४/०१/२०१८ रोजी पासून मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावले बाबत पुणे शहर वाहतूक शाखेकडून एकुण २४२७ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यापोटी १०,३०,२००/-रुपये तडजोड रक्कम वसूल करण्यात आली आहे.सदरची कारवाई यापुढेही परिणामकारक चालू ठेवण्यात येणार आहे.

तरी नागरीकांना/वाहनचालकांना याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावले असेल तर ते काढून टाकावे व त्याबाबत होणारी कारवाई टाळावी व सदर बाबतचे नियमांचे तंतोतंत पालन करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.